आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 29/04/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 112 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# १ मे पासून मोहीम सुरू

## मराठी शिकवण्यासाठी आरटीओकडून मदत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषेचा वापर अनिवार्य करण्याच्या निर्णयावरून वातावरण तापले असतानाच, सरकारने समन्वयाचा मार्ग स्वीकारत महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. प्रताप सरनाईक यांनी परिवहन विभाग आणि RTO अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर ही माहिती दिली.**

**परिवहन विभागाच्या निर्णयानुसार 1 मेपासून राज्यातील अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे बंधनकारक करण्यात येणार होते. या निर्णयाविरोधात परभाषिक चालक संघटनांनी 4 मे रोजी संप पुकारण्याचा इशारा दिला होता. तसेच, मराठी शिकण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणीही करण्यात आली होती.**



यावर तोडगा काढण्यासाठी झालेल्या बैठकीत मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले की, चुकीच्या पद्धतीने वाहन चालवणे, नियमांचे उल्लंघन करणे किंवा प्रवाशांची फसवणूक करणे अशा प्रकारांवर परिवहन विभाग कठोर कारवाई करेल. आवश्यक असल्यास संबंधित चालकांचा परवाना रद्द करण्याचाही अधिकार विभागाला राहील.

दरम्यान, रिक्षा-टॅक्सी संघटनांनीही मराठी भाषेचा आदर राखत ती शिकण्याची तयारी दर्शवली आहे. यानुसार, चालकांना मराठी शिकण्यासाठी RTO कार्यालयांमध्ये विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन केले जाईल तसेच शिकण्यासाठी पुस्तिकाही उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, 1 मेपासून मोहीम सुरुच राहणार असून चालकांना मराठी शिकवण्यासाठी प्रशासन पुढाकार घेणार आहे. त्यामुळे सक्तीबरोबरच मार्गदर्शनाचा समतोल साधण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात आहे.

या निर्णयामुळे संभाव्य संप टळतो का, आणि चालक कितपत सहकार्य करतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर सृष्टी प्रकल्पाचे पिंपरीत भूमिपूजन !

## रमाईंचा त्याग आणि समर्पणच बाबासाहेबांच्या कार्यामागची खरी ताकद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर या संघर्ष, त्याग आणि समर्पणाची जिवंत प्रतिमा होत्या. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीच्या महान कार्याला खंबीर साथ दिली.**

**बाबासाहेबांनी देशाला विचार, संविधान आणि स्वाभिमान दिला, पण त्या विचारांना उभं राहण्यासाठी जी शांत, नि:स्वार्थ ताकद लागते, ती रमाईंच्या रुपाने त्यांच्या पाठीशी होती. म्हणूनच पिंपरी येथे उभारण्यात येणारे माता रमाईंचे स्मारक म्हणजे केवळ एक वास्तू नसून त्याग, स्त्रीशक्ती आणि सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासाचे प्रेरणास्थान आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (भीमसृष्टी) लगतच्या मोकळ्या जागेत उभारण्यात



येणाऱ्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टीचे भूमिपूजन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर रवि लांडगे होते. भूमिपूजन सोहळ्यास आमदार महेश लांडगे, उमा खापरे, शंकर जगताप, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, माजी मंत्री विजय गिरकर, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, माजी महापौर तथा नगरसदस्य योगेश बहल, डॉ. वैशाली घोडेकर, शंकुतला धराडे, नगरसदस्य सिद्धार्थ बनसोडे, सारिका मासुळकर, राहुल भोसले, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, कुशाग्र कदम, तुषार हिंगे, नगरसदस्य शत्रुघ्न काटे, राहुल कलाटे, डॉ. सुहास कांबळे, धर्मपाल तंतरपाळे, कुणाल व्हावळकर, बाबासाहेब त्रिभुवन, कुंदन गायकवाड, निलेश नेवाळे, सारिका गायकवाड, निकिता कदम, सोनम मोरे, रेश्मा भुजबळ, श्रुती वाकडकर, तृप्ती कांबळे, प्रियांका कुदळे, योगिता बारणे, अर्चना सस्ते, माजी नगरसेवक विकास डोळस, मारुती भापकर, अंकुश कानडी, माजी नगरसदस्या चंद्रकांता सोनकांबळे यांच्यासह पुणे महापालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसदस्य निलेश आल्हाट तसेच सहशहर अभियंता मनोज से   ठिया, उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक व विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 29/04/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# ‘विकसित भारत’ घडविण्यासाठी नवोपक्रम व संशोधन महत्वाचे -राज्यपाल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे – देशाला 2047 पर्यंत ‘विकसित भारत’ घडविण्यासाठी नवोपक्रम, संशोधन आणि सर्वसमावेशक शिक्षण व्यवस्था अत्यावश्यक असून या माध्यमातून विकासाचे लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले.**




असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज( एआययू )च्या 100 व्या वार्षिक महासभेचे व “ज्ञान आणि नवोपक्रमातून स्वावलंबी भारत घडवणे” या विषयावर पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ येथे आयोजित राष्ट्रीय कुलगुरु परिषदेचे उद्घाटन राज्यपालांच्या हस्ते पार पडले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला एआययूचे अध्यक्ष प्रा. डॉ. विनय कुमार पाठक, महासचिव डॉ. पंकज मित्तल, डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, उपकुलपती डॉ. भाग्यश्री पाटील, कुलगुरु डॉ. एन. जे. पवार, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे , प्र-कुलगुरु डॉ. सोमनाथ पाटील, डॉ. स्मिता जाधव आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, नवोपक्रम आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, विद्यापीठांना राष्ट्रीय व जागतिक स्तरावर प्रगती करताना दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी प्रयत्न वाढवावेत. उच्च शिक्षण संस्थांनी नोकरी शोधणारे नव्हे, तर नोकरी निर्माण करणारे युवक घडवावेत. कौशल्य विकासाला प्राधान्य देत सर्वसमावेशक शिक्षण पद्धती उभारण्याचे आवाहनही राज्यपालांनी केले.

उच्च शिक्षणासाठी 50 टक्के प्रवेश प्रमाण गाठण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. पर्यावरणपूरक विकास, कृत्रिम बुद्धिमत्ता व प्रगत तंत्रज्ञानाचा शिक्षणात समावेश यावरही वर्मा यांनी भर दिला.

एआययूची शताब्दी परंपरा अधोरेखित करताना राज्यपाल वर्मा म्हणाले, ही संघटना उच्च शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वाची मार्गदर्शक संस्था असून देशातील विद्यापीठांना धोरणात्मक दिशा देत आहे. डॉ. एस. राधाकृष्णन, डॉ. झाकीर हुसेन आणि डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांसारख्या दिग्गजांनी घडविलेला शैक्षणिक वारसा आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

# पर्यटननगरी लोवाळ्यातील पार्किंगची समस्या सुटणार

## खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती, रेल्वे अधिकाऱ्यांसोबत बैठक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मावळ - मावळ लोकसभा मतदारसंघातील पर्यटनगरी असलेल्या लोणावळ्यात रेल्वे प्रवाशांना वाहने लावण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. रेल्वे स्टेशन लगत जागा उपलब्ध आहे. या जागेची पाहणी करुन तेथे वाहनतळ विकसित करावे. त्यामुळे पर्यटकांना पार्किंग उपलब्ध होईल, अशी सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना केली. त्यावर तत्काळ जागेची पाहणी करुन वाहनतळ विकसित करण्याची ग्वाही रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली.**



मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वेची चालू, प्रलंबित, प्रस्तावित कामांसदर्भात खासदार बारणे यांनी रेल्वेचे महाप्रबंधक हिरेशजी मीना यांच्याबरोबर आढावा बैठक घेतली. आमदार सुनील शेळके, अपर मंडल रेल प्रबंधक निरज यादव, मंडल वाणिज्य प्रबंध मानस पुरे, लोणावळा नगरपरिषदचे नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, शिवसेना शहर प्रमुख संजय भोईर, कर्जत प्रवासी संघटनेचे अध्यक्ष पंकज ओसवाल, लोणावळा नगरपरिषदचे नगरसेवक बैठकीला उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, पर्यटनगरी असलेल्या लोणावळ्यात रेल्वे प्रवाशांना वाहने लावण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. रेल्वे स्टेशन लगत जागा उपलब्ध आहे. या जागेची पाहणी करुन तेथे वाहनतळ विकसित करावे. त्यामुळे पर्यटकांना पार्किंग उपलब्ध होईल. रेल्वे अधिकाऱ्यांसाठी असलेल्या निवासस्थान परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती करावी. लोणावळ्यात रेल्वे अंतर्गत असलेल्या 25 एकर जागेत रेल्वे म्युझिम करावे. ओव्हर ब्रीजच्या कामाला गती द्यावी. कुमार रिसॉर्टपासून रस्ता बाजारपेठेत जातो. या पुलाचे रुंदीकरण करावे. मैदान विकसित करावे.

### स्थानिकांना भाडेतत्वार जागा उपलब्ध करून द्या

भुशी धरण परिसरात हंगामी स्वरुपाचा पर्यटन व्यवसाय करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी लावलेल्या दुकानांवर रेल्वे प्रशासनाकडूनअतिक्रमण कारवाई करण्यात आली. या परिसरामध्ये व्यवसाय करणारे स्थानिक नागरिक मागील 40 वर्षांपासून या ठिकाणी चहा, वडापाव, भजी विक्रीचा व्यवसाय करतात. केवळ व्यवसायच नाही तर भुशी धरणावर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेची काळजी देखील हेच व्यावसायिक घेत असतात. स्थानिक लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. यासाठी चर्चेतून मार्ग काढावा. रेल्वेची सुरक्षा, स्थानिकांचे हित पाहून समन्वयातून चांगला प्रस्ताव आणावा. स्थानिकांना भाडेतत्वार जागा उपलब्ध करुन देण्याची सूचनाही खासदार बारणे यांनी केली. यावर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 29/04/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# चाकणमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेच्या साईटवर मोठी चोरी उघड

## ७ जण ताब्यात, ३१ लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड : चाकण परिसरातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुरु असलेल्या बांधकाम साईटवरुन ॲल्युमिनियम सेंट्रींग प्लेट चोरी करणाऱ्या टोळीचा चाकण उत्तर पोलीसांनी पर्दाफाश करत चार मुख्य आरोपींसह चोरीचा माल विकत घेणाऱ्या तीन जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत सुमारे 31 लाख 10 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 10 एप्रिल ते 16 एप्रिल 2026 दरम्यान राक्षेवाडी (ता. खेड) येथील प्रधानमंत्री आवास योजनेच्या 210 घरांच्या बांधकाम साईटवरुन अज्ञात चोरट्यांनी सुमारे 20 लाख रुपये किंमतीच्या 280 स्क्वेअर मीटर ॲल्युमिनियम सेंट्रींग प्लेट्स चोरुन नेल्या होत्या. याप्रकरणी चाकण उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान घटनास्थळी आढळलेल्या एका बेवारस मोटारसायकलचा धागा पकडत तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने छाननी करत पोलिसांनी मुख्य आरोपी रामरक्षा उर्फ राजू धर्मराज पासवान (रा. सुसगाव) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपल्या साथीदारांची नावे उघड केली.

यानंतर पोलिसांनी स्वराज कालापाड, स्वप्नील कालापाड, अक्रम खान यांना येलवाडी येथून अटक केली.

तसेच चोरीचा माल खरेदी करणाऱ्या तिघांनाही ताब्यात घेतले आहे.

आरोपींकडून चोरीसाठी वापरलेली दोन चारचाकी वाहने, दोन मोटारसायकली आणि मोठ्या प्रमाणात ॲल्युमिनियम सेंट्रींग प्लेट्स जप्त करण्यात आल्या.ही कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, बसवराज तेली, तसेच पोलीस उप आयुक्त (परीमंडळ 3) मारुती जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

चाकण विभागाचे सहा पोलीस आयुक्त सचिन कदम व वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कामगिरी बजावली.

# 60 कोटींच्या बोगस उपसूचना प्रकरणात गुन्हे दाखल करा - रविराज काळे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : शहरातील कथित 60 कोटी रुपयांच्या बोगस उपसूचना प्रकरणावरुन राजकीय वातावरण तापले असून शहराध्यक्ष रविराज काळे यांनी या प्रकरणात संबंधित अधिकारी, नगरसेवक आणि कंत्राटदारांवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच, गैरव्यवहारात सहभागी नगरसेवकांचे पद रद्द करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.**




या प्रकरणात तब्बल 14 बोगस उपसूचनांच्या आधारे आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप आहे. यासंदर्भात मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी 17 एप्रिल रोजी दक्षता विभागाला पत्र देत संबंधित विभागांतील कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता, सहशहर अभियंता यांनाही जबाबदार धरण्याची सूचना केली आहे.

चौकशी समितीच्या अहवालानुसार, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 84(2), 86, 87 व 103 नुसार अर्थसंकल्पीय निधी खर्च, बदल किंवा कपात करण्यासाठी स्थायी समिति किंवा महापालिका सभेची मंजुरी आवश्यक असते. मात्र, संबंधित 14 उपसूचनांच्या बाबतीत ही प्रक्रिया न पाळल्याचे प्रथमदर्शनी समोर आले आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याचे स्पष्ट होत आहे.

आम आदमी पक्षाच्या प्रमुख मागण्या आम आदमी पार्टी युवक आघाडीच्या वतीने पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत :

-बिले तयार करणाऱ्या संबंधित अभियंते व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी.

-14 बोगस उपसूचनांवर स्वाक्षऱ्या करणाऱ्या नगरसेवकांवर गुन्हे दाखल करून त्यांचे पद रद्द करावे.

-कंत्राटदारांना दिलेली रक्कम वसूल करून त्यांना काळ्या यादीत टाकावे.

-संपूर्ण प्रकरणातील सर्व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.

रविराज काळे यांनी इशारा देत म्हटले आहे की, या प्रकरणात तातडीने कारवाई झाली नाही, तर आम आदमी पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल. दरम्यान, या गंभीर आरोपांमुळे महापालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 29/04/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला 'प्रोजेक्ट बेस्ड एक्झिबिशन'चे पाठबळ आवश्यक - अभिषेक बारणे

## विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीचे अभिषेक बारणे यांच्याकडून कौतुक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग' (प्रकल्प आधारित शिक्षण) ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केले.**




काळेवाडी येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ आणि आकांक्षा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणाऱ्या कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्रजी माध्यम शाळेच्या वतीने 'प्रोजेक्ट बेस्ड एक्झिबिशन'चे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य रितू पचारिया आणि विद्यार्थ्यांच्या वतीने मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, भाजपा मंडल अध्यक्ष सनी बारणे, शाळेचे शिक्षक, आकांक्षा फाउंडेशनचे प्रतिनिधी, पालक आणि निमंत्रित सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थेरगाव येथील शाळेच्या सेकंडरी कॅम्पसमध्ये हे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी विज्ञान, पर्यावरण, तंत्रज्ञान आणि सामाजिक जाणीव या विषयांवर आधारित अत्यंत कल्पक आणि वैविध्यपूर्ण प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता, ते प्रयोगांच्या माध्यमातून कसे मांडता येईल, याचे उत्तम सादरीकरण या प्रदर्शनातून केले. यावेळी सभापती अभिषेक बारणे यांनी प्रत्येक प्रकल्पाची बारकाईने पाहणी केली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या संकल्पना जाणून घेतल्या.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभिषेक बारणे म्हणाले की, "पुस्तकी ज्ञानासोबतच प्रकल्पांच्या माध्यमातून मिळणारे शिक्षण विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खऱ्या अर्थाने वाढवते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभाग आणि आकांक्षा फाउंडेशन यांच्या प्रयत्नातून महापालिका शाळांच्या गुणवत्तेचा आलेख दिवसेंदिवस उंचावणारा आहे, ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या प्रकल्पांचे आणि शाळेच्या या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे

# शहरातील केबल जाळ्यावर तात्काळ कारवाई करा - आमदार अमित गोरखे

## प्रशासनाला २४ तासांत संपूर्ण जाळे हटवण्याचे अल्टिमेटम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृत केबल आणि इंटरनेट वायरींचे जीवघेणे जाळे पसरले असून, प्रशासकीय दुर्लक्षामुळे आता निष्पापांचे बळी जाऊ लागले आहेत. काल सेक्टर 26 परिसरात घडलेल्या दुर्दैवी घटनेने प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला असून, या 'डेथ ट्रॅप'ला जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई कधी होणार? असा संतप्त सवाल आमदार अमित गोरखे यांनी उपस्थित केला आहे.**



सेक्टर 26 परिसरात वाय-फाय केबल गळ्यात अडकून श्रीमती संपदा पटवर्धन यांचा झालेला मृत्यू ही निव्वळ दुर्घटना नसून प्रशासकीय अनास्था आणि संबंधित कंपन्यांचा निष्काळजीपणा यामुळे झालेली 'हत्या' आहे, अशा तीव्र शब्दांत आमदार अमित गोरखे यांनी संताप व्यक्त केला आहे.

प्रबोधन सोसायटीमधील श्रीमती पाटवर्धन या ज्ञानप्रबोधिनी शाळेतून घरी परतत असताना शीत छाया परिसरात रस्त्यावर लोंबकळणाऱ्या केबलमुळे त्यांचा अपघात झाला. 4-5 फूट उंचीवर अशा प्रकारे मृत्यूचे पाश सोडून देणाऱ्या संबंधित इंटरनेट/वाय-फाय सेवा पुरवठादार कंपन्यांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी आमदार गोरखे यांनी केली आहे.

या घटनेची दखल घेत आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त आणि संबंधित विभागाला पत्र व्यवहार केला आहे.

मृत व्यक्तीच्या कुटुंबास आर्थिक मदत द्यावी.

तसेच संपूर्ण शहरातील, विशेषतः अंतर्गत रस्त्यांवरील लोंबकळणाऱ्या आणि धोकादायक केबल्स 24 तासांच्या आत हटवण्यात याव्यात. ज्या कंपनीची ती केबल होती,

त्या कंपनीचा परवाना रद्द करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.

पावसाळा तोंडावर असताना अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था आणि बेदरकार वाहनचालकांमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी तातडीने आवश्यक तिथे दर्जेदार स्पीड ब्रेकर बसवावेत, अशी भूमिका आमदार अमित गोरखे यांनी घेतली आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968